# श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास

(महाराष्ट्र शासन नियंत्रित)

एस्. के. बोले मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०००२८.
दूरध्वनी : ०२२ – ६२४९ ११११ / ११२
ईमेल : admin@siddhivinayak.org I info@siddhivinayak.org
वेबसाईट : www.siddhivinayak.org

श्री सिध्दिविनायक

## दरपत्रके मागाविण्यासंदर्भात सूचना

विषय : मंदिरातील कर्मचाऱ्यांचे गणवेश शिलाई करून घेणेबाबत.

कालावधी सन २०२५ – २०२६

श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिरातील न्यास आस्थापनेतील कार्यरत कर्मचाऱ्यांसाठी गणवेश शिलाई करण्याकरीता खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून विहित पध्दतीने मोहरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहे.

वरील कामाकरिता अटी, शर्तीबाबतची माहिती व दरपत्रके डाऊनलोड करण्यासाठी न्यासाच्या www.siddhivinayak.org या संकेतस्थळावर भेट द्यावी.

| | | |
|---|---|---|
| दरपत्रके प्रसिद्धीचा दिनांक | : | गुरुवार, दि. ११.१२.२०२५. |
| दरपत्रके सादर करण्याचा अंतिम दिनांक | : | मंगळवार, दि. १५.१२.२०२५. |
| दरपत्रके उघडण्याचा दिनांक | : | बुधवार, दि. १५.१२.२०२५. |

अटी व शर्ती :

१) मूळ दरपत्रकात नमूद निर्देशनाप्रमाणे (Specification) मंदिरातील न्यास आस्थापनेतील कर्मचाऱ्यांसाठी गणवेश शिलाई करण्यासाठी मोहरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहे.

२) आपण करीत असलेल्या कामाचा दर्जा उत्तम असावा.न्यासाने ठरवून दिलेल्या शिलाईबाबत तक्रार आढळल्यास त्याची भरपाई म्हणून बिलात कपात करण्यात येईल.

३) पुरवठादाराची मागील ३ वर्षाची आर्थिक उलाढाल कमीत कमी ५ लक्ष असल्याबाबतची सीए प्रमाणपत्रे सादर करावी.

४) दरपत्रकधारकाचे कार्यालयाचे अंतर न्यास कार्यालयापासून ३० किमी. च्या आत असणे आवश्यक आहे.

५) मंदिरातील न्यास आस्थापनेतील कर्मचाऱ्याचे गणवेश खरेदी विभागात पॅकिंग व फॉरवडिंगसह पोच करावयाचा आहे. साहित्यांच्या वाहतुकीचा खर्च वेगळा दिला जाणार नाही तसेच शिलाईची आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

६) सदर गणवेश शिलाई करण्याचे कार्यादेश प्राप्त झाल्यापासून १ महिन्याच्या आत पुरवठा करण्याची जबाबदारी आपली राहील. पुरवठ्याचे काम पूर्ण केल्यावर न्यासास बिल सादर करताना बिलात पॅन कार्ड / जीएसटी क्रमांक व कंपनीच्या बॅकेचा तपशील नमूद करणे.

७) दरपत्रकधारकाने कागदपत्रे देताना **A4** आकाराचा लिफाफ्यात द्यावीत . लिफाफा देताना तांत्रिक कागदपत्रे व मूल्य दरपत्रक तपशील याप्रमाणे **दोन** वेगवेगळया लिफाफ्यामध्ये भरून त्यावर संपूर्ण नाव, पत्ता, दूरध्वनी क्रमांक लिहून, **लाखेने सिलबंद** करून न्यास कार्यालयात जमा करावे.

८) दरपत्रकधारकाने मोहोरबंद दरपत्रकासोबत साक्षांकित करून सादर करावयाची तांत्रिक व मूल्य दरपत्रक कागदपत्रे :

**लिफाफा - १** अ) कंपनी नोंदणीचा दाखला

ब) सेवाकर जी.एस.टी. नोंदणी / ट्रेडिंग लायसन्स

क) आयकर नोंदणी कार्ड (पॅन कार्ड)

ड) मागील तीन वर्षाचा अनुभव दर्शवणारी कागदपत्रे

इ) पुरवठादाराची ३ वर्षाची आर्थिक उलाढाल कमीत कमी ५ लक्ष असावी.

**लिफाफा - २** अ) मूळ दरपत्रक

९) दरपत्रक भरतांना सर्व प्रकारचे कर वगळून रक्कम भरावी. दरपत्रकामध्ये स्विकृत दर अखेर पर्यत कायम राहतील कोणत्याही प्रकारची भाववाढ दिली जाणार नाही.

१०) नियमानुसार आवश्यक आयकर रक्कमेची कपात करण्यात येईल. तसेच सर्व प्रकारचे कर अदाकरण्याची जबाबदारी दरपत्रकधारकाची राहील.

११) कोणतीही कारणे न देता दरपत्रक स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार न्यासास असेल.

१२) कागदपत्रे सादर करण्यास असमर्थ ठरलेल्या दरपत्रकधारकाचे दरपत्रक निवड प्रक्रीयेतून बाद करण्यात येईल.

१३) मंदिरातील न्यास आस्थापनेतील कर्मचाऱ्याच्या कपड्यांच्या शिलाई संबधी कोणत्याही प्रकारच्या माहितीची आवश्यकता असल्यास श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी कार्यालयात दूरध्वनी **क्र. ०२२-६२४९११६०** वर संपर्क साधावा.

१४) उपरोक्त अटी व शर्तीत काही बदल, सुधारणा करण्याचा, शिथिल करण्याचा व जादा अटी शर्ती विहीत करण्याचा अधिकार न्यास व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. आपली कोणतीही अट / अटी न्यासावर बंधनकारक राहणार नाहीत.

Patil

(वीणा पाटील)
कार्यकारी अधिकारी

मूळ दरपत्रक

दरपत्रकामध्ये खालील बाबी अंतर्भुत करण्यात याव्यात

दरपत्रकधारकाचे नाव : ------------------------------------------------------------------------------------------

दरपत्रकधारकाचा कायमचा पत्ता : -----------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------------------------

दरपत्रकधारकाचा नोंदणी क्रमांक : ---------------------------------------------------------------------------

जी.एस.टी. क्रमांक : ----------------------------------------------------------------------------------------------

**BOQ**

**गणवेश शिलाई**

| अ.क्र. | तपशील व शिलाई करावयाची गणवेशांची अंदाजित संख्या | कर्मचारी वर्ग | शिलाई दर प्रती एक जोडी (कर वगळून) |
|---|---|---|---|
| १. | अंदाजित १० जोडी शर्ट व पॅन्ट | शिपाई | |
| २. | अंदाजित १२ जोडी शर्ट व पॅन्ट | वीजतंत्री | |
| ३. | अंदाजित ४ जोडी शर्ट व पॅन्ट | सुरक्षा अधिकारी | |
| ४. | अंदाजित १०६ जोडी शर्ट व पॅन्ट | पहारेकरी | |
| ५. | खाकी साडी ब्लाउज व परकर शिलाई सहित (अंदाजित २) | पहारेकरी | |
| ६. | अंदाजित १०२ जोडी शर्ट व पॅन्ट | सर्वसामान्य कामगार | |
| ७. | अंदाजित ४० जोडी नेहरू कॉलर झब्बा | सफाई कामगार | |
| ८. | अंदाजित ८ जोडी शर्ट व पॅन्ट | वाहन चालक | |
| ९. | अंदाजित १० जोडी | महिला कामगार | |
| | | **एकूण** | |

दरपत्रकधारकाची सही व शिक्का